
PRODUCED BY AN AUTODESK EDUCATIONAL PRODUCT


FIRST FLOOR - KEY PLAN
FIRST FLOOR PLAN
GROUND FLOOR / PARKING PLAN
TYPICAL 2nd TO 4th FLOOR PLAN
TYPICAL 2nd TO 4th FLOOR - KEY PLAN
PARKING AREA STATEMENT
TITLE
OWNER'S SIGNATURE
DATE
ARCHITECT SIGNATURE
SCALE
YASH ASSOCIATES
Yash Associates
PRODUCED BY AN AUTODESK EDUCATIONAL PRODUCT
The Seal of Joint Sub Registrar Class-2, Bhandara

# ग्रामपंचायत कार्यालय, बेला

## पंचायत समिती, भंडारा जि. भंडारा

जा. क्र. बांधकाम परवानगी /...४३८... /...१५..... / ग्रा. पं. बेला  दि. २५/०२/२०१५

प्रति,

① श्री निरेंद्र कामदेवसिंग
मा ② श्री शामसुंदर महावीरप्रसाद अग्रवाल
मु.+पो. बेला ता.+जि. भंडारा

विषय :- मौजा ...बेला... तह. जि. भंडारा त. सा. क्र. ...१०......... भु गट क्रं. २९५/१/६... मधील प्लॉट क्र....०५........ प्लॉट क्षेत्रफळ ..१०००१.६८ चौ. फुट..पैकी बांधकामाचे क्षेत्रफळ ..१५२०.३८८ स्क्वे. मी... मध्ये घर बांधकाम परवानगीबाबत (ठराव क्र. ११ (४) ९...... दि. २५/०२/२०१५..... नुसार )

संदर्भ :- आपले दिनांक ..२०/०२/२०१५..... चे अर्ज

महोदय,

उपारोक्त संदर्भाधीन अर्जाचे अनुषंगाने विषयांकित प्रकरणी खालील अटीच्या अधीन राहून तळमजला (ग्राउंड फ्लोअर / पहिला माळा / दुसरा माळा + निवारा ) करिता घर बांधकामाची परवानगी देण्यात येत आहे.
२०५.४५७ + ४५०.४५५ + ११६४.३४८ स्क्वे. मी = १५२०.३८८ स्क्वे. मी.

१. घर बांधणीच्या नकाशानुसार (प्लॉन) त्यात कोणताही फेरबदल न करता बांधकाम करणे बंधनकारक राहील.

२. भुखंडाचे सभोवताल मोकळी जागा सोडून घराचे बांधकाम करावे.

३. रस्त्यावर अथवा आजूबाजूच्या घरांना त्रास होणार नाही या दृष्टीने खिडक्या व दरवाज्यांची रचना ठेवावी.

४. रस्त्याने अथवा सार्वजनिकरित्या सांडपाणी वाहून जाण्याची कोणतीही पक्की व्यवस्था (गटारे) नसल्यास स्वत:चे सांडपाणी घराच्या मागील भागात स्वत:चे भूखंडामध्ये सोष खड्डयाद्वारे मुरवावे लागेल. रस्तावर अथवा उघडया ठिकाणी सांडपाणी वाहू देता येणार नाही.

५. घर बांधकाम करतांना दुसऱ्याचे जागेत अथवा सार्वजनिक जागेवर अतिक्रमण होणार नाही याची खबरदारी घ्यावी. अन्यथा नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस आपण स्वत: जबाबदार राहाल.

६. घरबांधकाम करतांना शौचालय बांधणे अनिवार्य राहील. त्याचे क्षेत्र १.१ चौ. मी. पेक्षा कमी असणार नाही.

७. महाराष्ट्र ग्रा. प. (गावठान विस्ताराचे तत्वे आणि इमारतीचे नियमन १९६७) व मु. ग्रा. अधिनियम १९५८ चे कलम ५२ पोट कलम २ च्या नियमावलीचे उल्लंघन होता काम नये.

८. घर बांधकामाची मंजुरी मिळाल्याचे दिनांकापासुन १ वर्षाच्या आंत बांधकाम सुरु न केल्यास नव्याने परवानगी घेणे आवश्यक राहील.

९. परवानगीचे अटी विरुध्द बांधकाम केल्यास नियमानुसार दंडास व शिक्षेस पात्र राहील.

१०. गुरांचा गोठा, संडास व तत्सम दुय्यम इमारती, भुखंडाच्या मागील सिमेनजीक मुख्य इमारतीपासुन कमीत कमी ३ मी, अंतरावर असतील.

११. राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा रस्ता, इतर जिल्हा रस्ता व ग्राम रस्ता यासारख्या

मानकानुसार असतील व गावामध्ये त्या-त्यावेळी असा कोणताही विधी अंमलात नसेल तर राज्य शासनाने महामार्गावर पट्टी वजा घरबांधणीस प्रतीबंध करण्यासाठी जे आदेश दिले असतील त्यानुसार असतील.

१२. खाजगी ले-आऊट मधील रस्ते, नाल्या व इतर विकास कामांची कालमर्यादित हमी ग्रामपंचायतची असनार नाही.

१३. पावसाचे छतावर पडणारे पाणी जमिनीत मुरविणे बंधनकारक राहील.

१४. सदर बांधकाम बुडीत क्षेत्र / पार्श्वजल पातळीने बाधीत होत नसल्याबाबत सहाय्यक अभियंता श्रेणी गोसीखुर्द पुनर्वसन उपविभाग क्र. ६ भंडारा - आंबाडी हयांचे कार्यालयातुन परवानगी घेतल्याशिवाय बांधकाम करु नये.

१५. कमीत कमी दोन ते पाच झाडे लावणे हे बंधनकारक आहे.

सरपंच
ग्रामपंचायत बेला

ग्रामविकास अधिकारी
सचिव
ग्रामपंचायत बेला
ग्रामपंचायमत, बेला

• प्रतिलीपी :-

मा. खंड विकास अधिकारी, पं. स. भंडारा
यांना माहितीस्तव सविनय सादर.